४ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत उद्दिष्ट व साध्य व त्या अनुषंगाने सन २०१८ मधील वृक्ष लागवडीबाबत नियोजन व पूर्वतयारी..

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१७/प्र.क्र.११९/काम ९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ मार्च, २०१८.

वाचा : शासन परिपत्रक उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक संकिर्ण २०१६/प्र.क्र. ८९/काम ९ दिनांक २० फेब्रुवारी, २०१७

प्रस्तावना :-

हरित महाराष्ट्राचा संकल्प साकार करणे आणि राज्याचे वृक्षाच्छादन २० टक्केवरुन ३३ टक्केपर्यंत नेण्याचा भाग म्हणून येत्या ३ वर्षात ५० कोटी वृक्ष लागवडीचा शासनाने निर्धार केला आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या कार्यालये, संशोधन संस्था इत्यादी ठिकाणी वृक्ष लागवड करणे शक्य आहे. या संदर्भात संदर्भाधीन परिपत्रकान्वये सविस्तर सूचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत. पर्यावरण संतुलित आणि हिरवाईने समृध्द महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि त्यातून दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष यावर मात करण्यासाठी एकत्रितपणे आणि एकजिनसीपणाने काम करुन वृक्ष लागवडीचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत कामगार प्रभागास सन २०१८-१९ या वर्षासाठी एकूण १,२५,००० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आलेले आहे. सदर उद्दिष्ट पूर्ण होण्याच्या दृष्टीने आपण आतापासूनच आवश्यक ती तयारी करावी. तसेच विभागाचे वृक्षारोपणातील योगदान योग्य पध्दतीने प्रतिबिंबित होण्यासाठी वन विभागाच्या संकेतस्थळावर दिलेल्या विहीत कालमर्यादेत आवश्यक माहिती भरण्याची दक्षता घ्यावी.

वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचा सूक्ष्म आराखडा तयार करणे, त्या त्या वर्षातील वृक्ष लागवडीसाठी वृक्षांची निवड करुन अक्षांश व रेखांशासह सुयोग्य स्थळांची निश्चिती करणे, निकषाप्रमाणे खड्डे तयार करणे, जून-जुलै मधील वृक्ष लागवड, वृक्ष लागवडीचा प्रत्यक्षदर्शी अहवाल (Real Time Reporting) आणि अंतिमत: संगोपन या विषयी शासन निर्णयात विहीत केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे दिलेल्या कालमर्यादेत कार्यवाही करावी. तसेच हयाबाबतची माहिती विहीत विवरणपत्रात प्रधान मुख्य संरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर व सचिव (वने) यांना पाठविण्यात यावी. तसेच प्रधान सचिव (कामगार) यांना माहिती स्वतंत्रपणे पाठवावी.

वृक्षारोपणाचा दृश्य परिणाम दिसून येण्यासाठी संवर्धन, पाणीपुरवठा, जनावरांपासून रोपांचे संरक्षणासाठी जैविक किंवा तारांचे/प्लास्टिक कुंपण, कायमस्वरुपी देखभाल, निगा, जोपासना व संगोपन इत्यादी कामांचा नियोजन आराखडा तयार करावा व त्यानुसार कार्यवाही करावी. तसेच या वृक्षाचे जिवंत राहण्याचे प्रमाण (Survival rate) किमान ८० टक्के ते ९० टक्के राहणेबाबत काळजी घ्यावी.

या कार्यक्रमांतर्गत होणारा खर्च मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा. तसेच आवश्यक तेथे सी.एस.आर.फंडातून तरतूद उपलब्ध करुन घ्यावी. जिथे निधीची अडचण असेल त्या ठिकाणी वन व सामाजिक वनीकरण विभागामार्फत मोफत रोपे देण्याचा प्रयत्न केला जाईल. त्याबाबतची आवश्यक ती नोंद आणि लेखा इत्यादीबाबत रोपे उपलब्ध करुन घेणारा विभाग व रोपे उपलब्ध करुन देणारा विभाग अशा दोन्ही विभागांमार्फत ठेवण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३१४१५०५१९१५१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.03.14 15:10:20 +05'30'

(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (कामगार व प्रशासन) यांचे स्वीय सहायक, उ.ऊ.व का.विभाग,मंत्रालय,मुंबई.
२. सर्व सह /उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. कामगार आयुक्त,कामगार भवन,भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, सिटी पार्क जवळ, बांद्रा (पूर्व),मुंबई-५१,
४. विकास आयुक्त (असंघटीत कामगार), कामगार भवन,भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, सिटी पार्क जवळ, बांद्रा (पूर्व),मुंबई-५१,
५. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कामगार भवन, ५वा मजला, ब्लॉक-ई, भूखंड क्र.सी-२०, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,
६. संचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, कामगार भवन, सातवा मजला, भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,
७. प्रबंधक, औद्योगिक न्यायालय,प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०००५१.
८. संचालक, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल, मुंबई- ४०००१२.
९. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबु गेनू मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई-४०००१३.
१०. निवडनस्ती (काम ९).